# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस

**प्रेस नोट** **दिनांक – १६/०५/२०२६**

**'' मोसैक वेलनेस प्रा. लि. कंपनीने बनविलेल्या विटामिन पुरक खादय पदार्थांची एक्सपायरी डेट सपंली असताना त्या खादय पदार्थाचे पॉकेट व डब्यावर बनावट तारखेचे लेबल लावुन त्यांची विक्री करून फसवणुक करणा–या टोळीस एकुण २६,६३,५०९/– रूपयांच्या विटामिन पुरक खादयपदार्थाच्या मुद्देमालासह गुन्हे शाखा, युनिट–०३, कल्याण यांनी केले जेरबंद ''**

---

दिनांक १३/११/२०२५ रोजी गुन्हे शाखा, घटक ३, कल्याणकडील सहायक पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांना मोसैक वेलनेस प्रा. लि. कंपनीने बनविलेल्या विटामिन पुरक खादय पदार्थांची एक्सपायरी डेट झालेल्या खादय पदार्थाच्या पॉकेट व डब्यावर बनावट एक्सपायरी डेटचे लेबल लावुन त्यांची विक्री करीत असल्याची माहिती मिळाली होती. सदर मिळालेल्या बातमीवरून गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अमंलदार यांनी दिनांक १४/०५/२०२६ हिना मिनी बाजार, शॉप नंबर ६ए जुबेदा प्लाझा जुना मच्छीबाजार, बाजारपेठ, कल्याण पश्चिम जि.ठाणे या ठिकाणी छापा कारवाईकरून हिना मिनी बाजारचे मालक आरोपी **१) अब्दुलकरीम रईस खान, वय ४० वर्ष, धंदा व्यापार, राह. मलंग चाळ, रूम नंबर १०, पत्रीपुल, कचोरे रोड, डोंबिवली पुर्व, ता. कल्याण जि. ठाणे** यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन मोठया प्रमाणात मोसैक वेलनेस प्रा. लि. कंपनीचा एक्सपायरी डेट झालेल्या विटामिन पुरक खादय पदार्थ जप्त करण्यात येवुन अधिक सखोल तपास करण्यात आला असता तपासात आरोपी अब्दुलकरीम रईस खान याने आरोपी इसम **२) बिरबल रामदुलाहार यादव, वय ४३ वर्ष, राह. ठि. शिवाजी पॅलेस, रूम नंबर ६०४, देवजीनगर, नारपोली, भिवंडी** याचेकडून मोसैक वेलनेस प्रा. लि. कंपनीचा एक्सपायरी डेट झालेल्या विटामिन पुरक खादय पदार्थ खरेदी करून तो त्याच्या हिना मिनी बाजार दुकानात विक्री करीता ठेवला असल्याचे निष्पन्न झाले.

आरोपी इसम नामे बिरबल रामदुलाहार यादव याचा शोध घेवुन त्यास त्याचे भिवंडी येथील गोडावुनमध्ये ठेवलेला **एकुण २६,६३,५०९/–रूपये** किंमतीचा मोसैक वेलनेस प्रा. लि. कंपनीचा विटामिन पुरक खादय पदार्थ एक्सपायरी डेट झालेला असतांना व तो लोकांचे जिवीतास अपायकारक आहे याची जाणीव असतांना देखील त्यावरील एक्सपायरी डेट लेबल काढून त्यावर मुदतवाढीच्या तारखेचे लेबल लावलेल्या साठयासह ताब्यात घेवुन सदरचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तो खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| Litter Joys, Mileet Choco Crunch | Litter Joys, Gluten Free Pasta |
| Litter Joys, Multi Millet Pasta | Litter Joys, Peanut Butter |
| Litter Joys, Nitrimax Chocolate Flavour | Litter Joys, Chocolate Hazelnut Spread |
| Litter Joys, Nutrimix Vanilla/Chocolate/Stroberry Flavour | Litter Joys, Multivitamin Gummies |
| Man Matters, NOURISH Ashwagandha Gummies | Be Bodywise TM, 10% Vitamin C face serum |
| Be Bodywise TM, Hair Gummies | Be Bodywise TM, nutrition Super Blend |
| Be Bodywise TM, 10% Magnesium Lotion | Litter Joys, Millet Pancake Mix Chocolate Flavour |

वरीलप्रकारचे सर्व प्रोडक्ट जप्त करून नमुद आरोपी १) अब्दुलकरीम रईस खान २) बिरबल रामदुलाहार यादव यांचेविरूध्द श्री. सचिन रमेश गोसावी, वय ४६ वर्षे, व्यवसाय– नोकरी (नेत्रीका कन्सल्टींग इंडीया प्रा.लि.कंपनी) रा.ठि. ०३/३५, प्रगती चाळ, शांतीलाल कंम्पाउंड, जवाहरनगर, खार पुर्व, मुंबई–४०००५१, यांनी दिलेल्या फिर्यादीवरून **बाजारपेठ पोलीस ठाणे गु.र.नं. १५३/२०२६ भा.न्या.संहिता २०२३ चे कलम ३१८(४), ३३६(३), २७५, ३(५) प्रमाणे** गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील नेम.गुन्हे शाखा, घटक–३, कल्याण हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. श्री. आशुतोष डुंबरे सो, पोलीस आयुक्त, ठाणे शहर, मा. श्री पंजाबराव उगले, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, ठाणे शहर, मा. श्री. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे शहर व मा. श्री. शेखर बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (शोध १) गुन्हे शाखा, ठाणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अजित शिंदे, सहा.पो.निरी. सर्जेराव पाटील, सहा.पो.निरी. बळवंत भराडे, पोउपनिरी किरण भिसे, सपोउपनिरी दत्ताराम भोसले, सहा.पो.उप निरी. बालाजी शिंदे, पोहवा/सुधीर कदम, पोहवा/विजय जिरे, पोहवा/सचिन भालेराव, पोहवा/गोरक्षनाथ पोटे, पोहवा/विलास कडु, पोहवा/सचिन कदम, पोहवा/आदिक जाधव, पोहवा/पांडुरंग भांगरे, पोहवा/उल्हास खंडारे, पोहवा/जयकर जाधव, पोहवा/प्रशांत वानखेडे, पोना/प्रविण किनरे, पोना/दिपक महाजन, पोशि/गुरूनाथ जरग, पोशि/सतिश सोनवणे, पोशि/मिथुन राठोड, पोशि/विनोद चन्ने, पोशि/गणेश हरणे, पोशि/गोरक्ष शेकडे,पोशि/जालिदंर साळुंके, मपोशि/मंगल गावित, सपोउपनि/अमोल बोरकर, सर्व नेम. गुन्हे शाखा, घटक–३, कल्याण यांनी केलेली आहे.

————०००००————